## पंतप्रधानांची कुवेतच्या युवराजांशी भेट

22 डिसेंबर 2024

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज कुवेतचे युवराज महामहिम शेख सबाह अल-खालिद अल-हमद अल-मुबारक अल-सबाह यांची भेट घेतली. पंतप्रधानांनी सप्टेंबर 2024 मध्ये UNGA अधिवेशनादरम्यान महामहिम युवराज यांच्याशी नुकत्याच झालेल्या भेटीचे प्रेमपूर्वक स्मरण केले.

2. कुवेतसोबतच्या द्विपक्षीय संबंधांना भारत अत्यंत महत्त्व देतो, असा संदेश पंतप्रधानांनी दिला. नेत्यांनी मान्य केले की द्विपक्षीय संबंध चांगल्या प्रकारे प्रगती करत आहेत आणि धोरणात्मक भागीदारीकडे होत असलेल्या त्यांच्या उन्नतीचे स्वागत केले. त्यांनी संयुक्त राष्ट्र आणि इतर बहुपक्षीय मंचांवर उभय बाजूंमधील घनिष्ठ समन्वयावर भर दिला. कुवेतच्या अध्यक्षतेखाली भारत-GCC संबंध अधिक दृढ होतील असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

3. पंतप्रधानांनी कुवेतचे महामहिम युवराज यांना परस्पर सोयीस्कर तारखेला भारत भेटीसाठी आमंत्रित केले.

4. कुवेतचे महामहिम युवराज यांनी पंतप्रधानांच्या सन्मानार्थ मेजवानीचे आयोजन केले होते.

**कुवेत**

**22 डिसेंबर 2024**